**Covid-19**
**Top Most Priority**

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# जिल्हाधिकारी कार्यालय,पुणे ,(आपत्ती व्यवस्थापन शाखा)

दुरध्वनी क्र.०२०-२६१२३३७१
e-mail ID:-homebranchpune@gmail.com

वाचा :-१. मा.गृह मंत्रालय भारत सरकार यांचेकडील आदेश क्र.४०-३/२०२० डी दि.१/०५/२०२०
२. महसूल व वन विभाग, महाराष्ट्र शासन यांचे आदेश क्र. DMU/२०२०/CR.९२/DisM-१/ दि. १/०५/२०२०
३. महसूल व वनविभाग, महाराष्ट्र शासन यांचे आदेश क्र. DMU/२०२०/CR.९२/DisM-१/ दि. २/०५/२०२०
४. महसूल व वनविभाग, महाराष्ट्र शासन यांचे आदेश क्र. DMU/२०२०/CR.९२/DisM-/दि.3/५/२०२०
५. या कार्यालयाकडील आदेश क्रं. जि.आ.व्य./कावि/ ८७१/२०२० दिनांक ०४/०५/२०२०

*****************************************************************************

जिल्हाधिकारी पुणे

क्र.आव्यप्र/कावि/ ८०८ /२०२०
पुणे, दिनांक-०६ /०५/२०२०

विषय :- लॉकडाऊन काळात शासनाने सुरु करणेस परवानगी देणेत आलेल्या यंत्रणांना पेट्रोल पंपावर पेट्रोल व डिझेल पुरविणेबाबत..

**सुधारीत आदेश**

ज्याअर्थी, आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील कलम २५ अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे व त्यातील पोट कलम 2 (अ )नुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी हे उक्त प्राधिकरणाचे पदसिद्ध अध्यक्ष आहेत.

ज्याअर्थी, राज्य शासनाने कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३ मार्च २०२० पासुन लागु करुन करुन खंड २, ३, ४ मधील तरतुदीची अंमलबजावणीसाठी अधिसूचना निर्गमित केलेली आहे. त्याबाबतची नियमावली संदर्भिय ३ अन्वये प्रसिध्द केली आहे आणि जिल्हाधिकारी यांना सक्षम प्राधिकारी घोषित केलेले आहे.

ज्याअर्थी, कोविड-१९ विषाणुच्या साथ संसर्गाचा प्रादुर्भाव झपाटयाने वाढत असल्याने आपत्कालीन उपाय योजनेचा भाग म्हणुन संदर्भिय ४ अन्वये मा.गृह सचिव आणि अध्यक्ष राष्ट्रीय कार्यकारी समिती भारत सरकार, यांनी आपत्ती व्यवस्थापन कायदा कलम १० (२) अन्वये संपुर्ण देशभरात मार्गदर्शक सुचना, आदेश लागु केलेले आहेत. या अनुषंगाने नागरिकांची गर्दी होवु नये आणि परस्पर संपर्क होवुन संसर्ग वाढु नये याकरिता जमाबंदी आदेश लागु केलेले आहेत आणि उपरोक्त संदर्भ क्र.१ व २ अन्वये सदरचे लॉकडाऊन चे आदेशास दि.१७/०५/२०२० पर्यंत मुदतवाढ देणेत आलेली आहे.

त्याअर्थी खालील प्रमाणे आदेश करणेत येत आहे.

१) पुणे जिल्ह्यातील पुणे महानगरपालिका, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पुणे, खडकी व देहूरोड छावनी परिषद,नगरपरिषद, नगरपालिका, नगरपंचायत व पुणे ग्रामीण क्षेत्रातील प्रतिबंधित क्षेत्र (Containment Zone) वगळून इतर सर्व क्षेत्रामध्ये पेट्रोल/डिझेल पंपचालकांनी येणा-या **सर्व वाहनांना पास/ओळखपत्राची मागणी न करता सकाळी ७.०० ते सायंकाळी ७.०० या वेळेमध्ये पेट्रोल/डिझेलचा पुरवठा करणेत यावा.**



Scanned with CamScanner

२. राष्ट्रीय महामार्गावरिल पेट्रोल/डिझेल शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या विहित वेळेमध्ये सुरू राहतील.

(नवल किशोर राम)
जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,
जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे

जिल्हाधिकारी पुणे

प्रत :- १) विभागीय आयुक्त कार्यालय पुणे विभाग पुणे यांना माहितीसाठी सादर.
२) पोलीस आयुक्त, पुणे शहर/पिंपरी चिंचवड, यांना पुढील कार्यवाहीसाठी
३) पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांना पुढील कार्यवाहीसाठी
४) जिल्हा पुरवठा अधिकारी, पुरवठा शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे
५) अन्नधान्य वितरण अधिकारी, अन्नधान्य वितरण कार्यालय, पुणे
६) अध्यक्ष, जिल्हा पेट्रोल/ डिझेल पंप असोसिएशन, जिल्हा पुणे.

DESCSTOP/ RONIT1

Scanned with CamScanner